**वित्तीय सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून नियमितपणे कारणेबाबत.......**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय.**

**जा.क्र.सआ/लेखापरीक्षण/परिपत्रक/चाचणी लेखापरीक्षण/2380/२०१७, दिनांक 25/१०/२०१७**

## : परिपत्रक :

२/- महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियमान्वये **संस्था** प्रत्येक वित्तीय वर्षात निदान एकदा आपले लेख्यांची लेखापरीक्षा करवील, अशी तरतुद आहे. तदनुषंगाने संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेद्वारे चालू आर्थिक वर्षासाठी नामतालिकेमधील सनदी लेखापाल, सनदी लेखापालांच्या फर्मस, कॉस्ट अकौटंट, कॉस्ट अकौटंटच्या फर्मस, प्रमाणीत लेखापरीक्षक व शासकीय लेखापरीक्षक यांचे मधुन अर्हताधारक लेखापरीक्षकाची नेमणूक वैधानिक लेखापरीक्षणास्तव करणेत येते. अधिनियमातील सदरहू तरतुद पाहता, सुधारित अधिनियमान्वये लेखापरीक्षकाच्या नियुक्तीची स्वायत्तता संस्थेस प्रदान करणेत आलेली आहे. तथापि संस्थेने लेखापरीक्षकाची नेमणूक न केल्यास संबंधीत निबंधकास परंतुकाखालील आदेशाने लेखापरीक्षकाच्या नेमणूकीचे अधिकार आहेत.

३/- महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या अधिनियमातील कलम ८१ (१) (अ) अन्वये संस्थेचे वैधानिक लेखापरीक्षण पुर्ण होणे अनिवार्य आहे. संस्थेची आर्थिक व सांपत्तिक स्थिती निदर्शनास येणेसाठी, संस्थेच्या कामकाजातील अनियमितता व गंभीर बाबी वेळीच निष्पन्न होणेसाठी, संस्था अधिनियम, नियम व पोटनियमान्वये यथोचितरित्या कामकाज पार पाडत असल्याचे निदर्शनास येणेसाठी व संस्थांच्या कामकाजात गुणात्मक सुधारणा होणेसाठी वैधानिक लेखापरीक्षणास अनन्यसाधारण महत्व आहे. संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग व लेखापरीक्षकाचे लेखापरीक्षण अहवालातील अभिप्राय यावर संस्थेची विश्वासार्हता अवलंबुन असते. संस्थेच्या वार्षिक सर्व साधारण सभेमध्ये लगतच्या आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभासदांच्या मान्यतेसाठी ठेवण्यात येतो, ही बाब देखील अधिनियमान्वये अनिवार्य आहे. ज्यामुळे लेखापरीक्षणाचे महत्व व लेखापरीक्षण अहवालाची विश्वासार्हता अधोरेखीत होते.

४/- महाराष्ट्र राज्यामध्ये मध्यस्थाचे / सावकाराचे उच्चटन होणेचे दृष्टीकोनातून सहकारी चळवळी अंतर्गत वित्त पुरवठा करणा-या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, नागरी सहकारी पतसंस्था, ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था, नोकरदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था यांची संख्या अन्य राज्यांच्या तुलनेत मोठया प्रमाणात आहे. यामुळे कार्यक्षेत्रनिहाय ज्या-त्या भु-भागातील ठेवी संकलीत होऊन सभासदांना त्यांचे गरजेप्रमाणे कर्ज रूपाने निधी उपलब्धतेची विपुलता वाढलेली आहे. वित्तीय सहकारी संस्थांच्या सदरहू कामकाजामुळे सभासदांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणेस हातभार लागल्याने राज्याच्या अर्थव्यवस्थेस देखील चालना मिळालेली आहे.

५/- सहकारी चळवळी मधील वित्तीय संस्था अचानक आर्थिक अडचणीमध्ये येण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या वित्तीय सहकारी संस्थांमध्ये शेतकरी, छोटे व्यावसायीक, नागरी व ग्रामीण मजुर वर्ग, जेष्ठ नागरीक, नोकर वर्ग, विधवा व परित्यक्त्या इ. समाज घटकांच्या ठेवी आर्थिक काटकसर करून ठेवल्या जातात. संस्था आर्थिक अडचणीत आल्याने या सभासदांच्या ठेवी आदा करणे संबंधीत संस्थेस शक्य होत नाही. त्यामुळे सहकारी चळवळीच्या विश्वासर्हतेस बाधा पोहचून समाजामध्ये मोठा जनक्षोभ पसरतो. परिणामी याची जबाबदारी राज्यशासन व सहकार विभागावर येते.

६/- सुधारित अधिनियमान्वये लेखापरीक्षक नेमणूकीची स्वायत्तता संबंधीत संस्थांना प्रदान केल्याने, संस्थांमार्फत सातत्याने नामतालिकेवरील सनदी लेखापाल व प्रमाणीत लेखापरीक्षकांच्या नेमणूका नियमीत वार्षिक लेखापरीक्षणास्तव केल्या जात आहेत. वित्तीय संस्थांची आर्थिक पत टिकून राहणेसाठी संस्थेचे व्यवस्थापन, लेखापरीक्षक व लेखापरीक्षण अहवालाची सभासदांमधील साशंकता कमी करणेसाठी या संस्थांवर व लेखापरीक्षकांवर प्रभावी नियंत्रण व पर्यवेक्षण राखणे आवश्यक असलेने या वित्तीय सहकारी संस्थांचे प्रतिवर्षी ठरावीक प्रमाणात विशिष्ट आर्थिक मुद्दे निर्धारित करून लोकहितार्थ चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकाद्वारे करणे आवश्यक झालेले आहे.

७/- संस्थेस आर्थिक अडचणीत येण्यास कारणीभुत ठरणा-या विविध बाबी वेळीच उजेडात येण्यासाठी, लेखापरीक्षकाने आपल्या मुळ लेखापरीक्षणावेळी काही बाबी अनावधानाने किंवा हेतुपूरस्सर तपासण्याचे टाळले गेल्याची बाब वेळीच निदर्शनास येण्यासाठी, मुळ वार्षिक लेखापरीक्षण व्यवस्थितपणे पार पाडले गेले नसल्याचे अथवा विहीत कायदा, अधिनियम व नियमाच्या आधारे ते झाले नसल्याचे वेळीच निदर्शनास येणेसाठी व लेखापरीक्षणाअंती अधिनियमास अभिप्रेत उचित परिणाम साधणेस्तव या वित्तीय सहकारी संस्थांचे प्रतिवर्षी ठरावीक प्रमाणात विशिष्ट आर्थिक मुद्दे निश्चित करून चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकाद्वारे करणे आवश्यक झालेले आहे.

८/- महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियमातील **कलम ८१ (३) (क)** अन्वये असलेली तरतुद पुढील प्रमाणे आहे.

**" लेखापरीक्षकाने सादर केलेल्या लेखापरीक्षा अहवालात लेख्यांचे खरे व अचूक चित्र उघडकीस आणलेले नाही, असे निबंधकाच्या निदर्शनास आणून दिले तर, निबंधकास किंवा प्राधिकृत व्यक्तीस अशा संस्थेच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा करता येईल किंवा ती करवून घेता येईल. या चाचणी लेखापरिक्षेत, अशा आदेशात निबंधक विहीत करील व विनिर्दिष्ट करील अशा बाबींच्या तपासणीचा समावेश असेल. "**

सदरहू तरतुद पाहता पुढील बाबी प्राधान्याने अधोरेखित होतात.

अ) नियमित लेखापरीक्षणानंतर संस्थेच्या लेख्यांचे खरे व अचूक चित्र उघडकीस आणण्यासाठी चाचणी लेखापरीक्षणाची अधिनियमात वैधानिक तरतुद आहे.

ब) असे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकाकडून करून घेणेचा अधिकार निबंधक किंवा प्राधिकृत व्यक्तीस आहे.

क) सदरहू चाचणी लेखापरीक्षणाचे आदेश आर्थिक निकष / मुद्दे विहीत व निर्धारित करून पारीत करणे आवश्यक आहे.

ड) चाचणी लेखापरीक्षण करून संस्थेचे व्यवस्थापन व लेखापरीक्षक यांचेवर प्रभावी नियंत्रण व पर्यवेक्षण राखता येवू शकते.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, नागरी/ग्रामिण बिगर शेती / पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था इ. वित्तीय संस्थेच्या **आर्थिक व सांपत्तिक स्थितीवर** थोडयाच अवधीमध्ये **विपरित परिणाम** घडविणारे मुद्दे चाचणी लेखापरीक्षणासाठी **वित्तीय संस्था प्रकारनिहाय** सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे निश्चित करणेत आले आहेत.

संस्थेस आर्थिक अडचणीत येण्यास कारणीभुत ठरणाऱ्या विविध बाबी वेळीच उजेडात येण्यासाठी, लेखापरीक्षकाने आपल्या मुळ लेखापरीक्षणावेळी काही बाबी अनावधानाने किंवा हेतुपूरस्सर तपासण्याचे टाळले गेल्याची बाब वेळीच निदर्शनास येण्यासाठी, मुळ वार्षिक लेखापरीक्षण व्यवस्थितपणे पार पाडले गेले नसल्याचे अथवा विहीत कायदा, अधिनियम व नियमाच्या आधारे ते झाले नसल्याचे वेळीच निदर्शनास येणेसाठी व लेखापरीक्षणाअंती अधिनियमास अभिप्रेत उचित परिणाम साधणेस्तव या वित्तीय सहकारी संस्थांचे प्रतिवर्षी नियमित लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या वित्तीय संस्थांच्या २० % या प्रमाणात निश्चित केलेल्या **सोबतच्या परिशिष्टातील आर्थिक मुद्यांप्रमाणे** चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांद्वारे करणे आवश्यक झालेले आहे. याची अंमलबजावणी करणेचा कृति आराखडा व सर्वसाधारण सूचना पुढील प्रमाणे आहेत.

## चाचणी लेखापरीक्षणाचा कृती आराखडा तयार करणेसंबंधी सूचना :

सहकारी संस्थांचे नियमित लेखापरीक्षणानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८१ (३) (क) अन्वये संस्थेच्या लेख्यांचे खरे व अचूक चित्र उघडकीस आणण्यासाठी व लेखापरीक्षणाअंती अधिनियमास अभिप्रेत उचित परिणाम साधणेस्तव चाचणी लेखापरीक्षणाचा कृति आराखडा व त्याप्रमाणे आदेश पारीत करताना खालील कृती निर्देश विचारात घ्यावेत.

१. राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरीय संस्थांचा कलम ८१ (३) (क) अन्वये वार्षिक चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रम संबंधित जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी तयार करावा. सदरहू प्रस्तावित चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमातील संस्थांचे चाचणी लेखापरीक्षणाचे आदेश कार्यक्षेत्रनिहाय संबंधित निबंधकाकडून **सोबतच्या परिशिष्टातील आर्थिक मुद्यांप्रमाणे** पारित करावेत.

२. राज्यस्तरीय व विभागस्तरीय कार्यक्षेत्र असणाऱ्या संस्थांचे मुख्यालय ज्या जिल्ह्यामध्ये आहे, त्या जिल्ह्यामध्ये सदरहू संस्था वार्षिक चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमात लेखापरीक्षणासाठी प्रस्तावित करण्यात याव्यात.

३. वित्तीय संस्थांचे दिनांक ३० सप्टेबर अखेर नियमित लेखापरीक्षण पुर्ण झालेल्या संस्थांपैकी प्रतिवर्षी २० % संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण घेण्यात यावे. चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रम दिनांक १ नोव्हेंबर ते दिनांक ३१ ऑक्टोबर या कालावधीचा तयार करून त्याप्रमाणे प्रतिवर्षी अंमलबजावणी करावी.

**अ)** ज्या संस्थांची आर्थिक उलाढाल व व्यवहार मोठे आहेत उदा. महाराष्ट्र राज्य सह. बँक, जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, नागरी सह.बँका, मोठया पतसंस्था व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था इ. संस्थांसाठी चाचणी लेखापरीक्षणास्तव कार्यालय प्रमुख तथा गट अ व ब स्तरातील अधिकाऱ्यांना चाचणी लेखापरीक्षणास्तव प्राधिकृत करणेत यावे.

**ब)** चाचणी लेखापरीक्षणास्तव प्राधिकृत लेखापरीक्षकांच्या अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांची उपलब्धतेनुसार व आर्थिक व्यवहारानुरुप आवश्यकते प्रमाणे मदत घेणेत यावी.

**क)** ज्या संस्थांची आर्थिक उलाढाल व व्यवहार तुलनात्मकरित्या कमी आहे, अशा मध्यम व छोट्या संस्थांसाठी उदा. नागरी/ग्रामिण बिगर शेती/पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था इ. संस्थांसाठी लेखापरीक्षक श्रेणी-१, श्रेणी-२, व उपलेखापरीक्षक यांना प्राधिकृत करणेत यावे.

४. चाचणी लेखापरीक्षण कालावधी हा संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार, उलाढाल व कार्यक्षेत्र या अनुसार कामकाजाची व्याप्ती विचारात घेऊन ७ ते १० दिवसापेक्षा अधिक राहणार नाही, असा निश्चित करण्यात यावा.

५. सदरहू महत्वपूर्ण वित्तीय संस्थांचा चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रम तयार करतांना संस्था कार्यक्षेत्र, भाग भांडवल, ठेवी व कर्जे विचारात घेवून चाचणी लेखापरीक्षणाची वारंवारीता खालील नमूद निर्देश विचारात घेवून निश्चित करावी.

**अ)** राज्यस्तरीय व विभागस्तरीय वित्तीय संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण प्रतिवर्षी पूर्ण होईल, असे धोरण निश्चित करावे.

**ब)** गाव / तालुका व जिल्हा स्तरीय वित्तीय संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण ३ वर्षातून किमान एकदा पूर्ण होईल, असे धोरण राबवावे.

६. राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावर चाचणी लेखापरीक्षणासाठी वित्तीय संस्था समाविष्ट करतांना स्तरनिहाय संस्थांची द्विरुक्ती होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

७. चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये घेण्यात आलेल्या संस्थांचे संबंधित निबंधक कार्यालयास प्राप्त असलेले तक्रार अर्ज संबंधित प्राधिकृत लेखापरीक्षकास हस्तांतरीत करावे व चाचणी लेखापरीक्षा अधिका-याने लेखापरीक्षण करताना सदरहू तक्रार अर्जाची चौकशी करुन निष्पन्न निरीक्षणे या लेखापरीक्षण अहवालामध्ये स्वतंत्ररित्या नोंदवावीत.

८. चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये राज्य, विभाग, जिल्हा, तालुका / गाव स्तरावरील संस्थांच्या समावेशाची निश्चिती दरवर्षी माहे सप्टेबर मध्ये पूर्ण करण्यात यावी. अशा रितीने निबंधक निहाय राज्याचा वार्षिक चाचणी लेखापरीक्षण आराखडा एकत्रीतरित्या दरवर्षी १५ ऑक्टोबर पर्यत तयार करून वरिष्ठांकडे सादर करावा. या वार्षिक आराखड्याप्रमाणे चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमाची अंमलबजावणी दरवर्षी १ नोव्हेंबर पासून करण्यात यावी.

९. माहे नोव्हेंबर पासुन दरमहिन्याचा लक्षांक ज्या-त्या महिन्यामध्ये पूर्ण होईल, अशा रितीने संबंधित प्राधिकृत चाचणी लेखापरीक्षक यांनी संबंधीत वित्तीय सहकारी संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण करावयाचे आहे.

१०. चाचणी लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेले गंभीर आक्षेप, अभिप्राय यावर कलम ८१ (५)(ब) मधील परंतुकान्वये पुढील प्रशासकीय अथवा फौजदारी स्वरूपाची कारवाई संबंधीत निबंधकाने करावयाची आहे.

११. शिवाय चाचणी लेखापरीक्षणाअंती संस्थेच्या नियमित लेखापरीक्षकाने त्याचे लेखापरीक्षण अहवालामध्ये असे गंभीर आक्षेप व अभिप्राय नोंदविले नसतील अशी बाब निदर्शनास येईल तेव्हा कलम ८१ (५)(ब) अन्वयेच्या परंतुकान्वये संबंधीत नियमित लेखापरीक्षकावर कारवाई प्रस्तावित करावी.

**<u>सर्वसाधारण सूचना :-</u>**

१. चाचणी लेखापरीक्षण करावयाच्या संस्थांसाठी अधिकारी, कर्मचारी यांच्या नेमणुका करताना संबंधित संस्थेचे आर्थिक व्यवहार, उलाढाल व कार्यक्षेत्र याचा विचार करुन पदसंवर्ग श्रेणी अन्वये जेष्ठता राखली जाईल, अशा रितीने पदानुरूप नेमणूक केली जाईल, असे पहावे.

२. चाचणी लेखापरीक्षकाने तपासणीअंती निदर्शनास आणलेल्या महत्वाच्या मुद्यांबाबत शेवटच्या दिवशी संस्थेचे संचालक मंडळ अथवा संस्थेचे अध्यक्ष किंवा कार्यकारी संचालक यांचेशी चर्चा करावी त्यानंतर लेखापरीक्षा अहवाल अंतिम करावा.

३. वार्षिक चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमाप्रमाणे वित्तीय संस्थेचे चाचणी लेखापरीक्षण पूर्ण झालेनंतर लेखापरीक्षकाने १५ दिवसांचे आत चाचणी लेखापरीक्षा अहवाल संबंधित निबंधक व संस्थेस द्यावा. चाचणी लेखापरीक्षा अधिकाऱ्याने लेखापरीक्षण अहवालाचा दोष दुरूस्ती अहवाल संस्थेकडून १ महिन्याचे आत मागवून घेवून, त्यावर दुरूस्ती शेरे / अभिप्राय नोंदवून, तसा दोष निराकरण अहवाल संबंधित निबंधकाकडे सादर करावा. दोष दुरूस्ती अहवाल मागविण्याची जबाबदारी संबंधित चाचणी लेखापरीक्षा अधिकाऱ्याची राहील.

४. चाचणी लेखापरीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधित निबंधकाने त्यातील गंभीर दोष व मुद्दे यावर संस्थेचा दोष दुरूस्ती अहवाल १ महिन्याचे आत संबंधित प्राधिकृत लेखापरीक्षकाचे शेरे व अभिप्रायासह मागवून कायद्यातील तरतूदीप्रमाणे आवश्यक ती पुढील कार्यवाही १ महिन्याचे आत करावी.

५. या परिपत्रकास अनुसरून चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण घेणे आवश्यक आहे, असे संबंधित निबंधकास वाटल्यास त्या संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण निबंधक घेवू शकतील. तसेच तक्रार प्राप्त संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण देखील लेखापरीक्षण कार्यक्रमाशिवाय संबंधित निबंधकास वेळोवेळी करून घेता येईल.

६. चाचणी लेखापरीक्षण कार्यक्रमामध्ये घेण्यात आलेल्या संस्थांचे लेखापरीक्षण निश्चित केलेल्या कालावधीमध्ये कोणत्या क्रमाने व कधी करावयाची याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य संबंधित प्राधिकृत लेखापरीक्षकास राहील.

७. राज्य, विभाग, जिल्हा व तालुका पातळीवर विविध दैनिक वृत्तपत्रांमध्ये वित्तीय संस्थांबाबत छापून आलेल्या बातम्या, लेखी तक्रारी, विविध स्त्रोतांमार्फत मिळालेली गैरव्यवहाराबाबतच्या माहितीची शहानिशा करुन अशा संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण प्राधान्याने घेण्यात यावे.

८. अपहार, गैरव्यवहार व निधीच्या गैरविनियोगास अनुसरून महत्वपुर्ण माहिती असताना अशा संस्थांचे चाचणी लेखापरीक्षण प्राधान्याने न घेतल्यास अथवा तसा प्रस्ताव वरिष्ठ प्राधिकरणाकडे सादर न केल्यास त्यास संबंधीत जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक जबाबदार राहतील.

९. चाचणी लेखापरीक्षणाअंती निदर्शनास आलेले अपहार, गैरव्यवहार व निधीच्या गैर विनियोगाबाबत पुढील कारवाई न झाल्यास जबाबदार ठरणाऱ्या अधिकाऱ्यांविरूध्द / लेखापरीक्षकांविरूध्द पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

१०. सदरचे चाचणी लेखापरीक्षण करतांना संस्थांच्या विश्वसार्हतेस व आर्थिक पतीस बाधा पोहचेल अशी जाहीर विधाने करण्यात येवू नये.

११. सदरहू परिपत्रकीय निर्देशान्वये होणा-या चाचणी लेखापरीक्षणाअंती प्राधिकृत लेखापरीक्षक व त्यांचे मदतनीस यांचे विषयी गैरवर्तन अथवा गैरप्रकार याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या व त्यामध्ये चौकशी अंती तथ्य आढळून आल्यास संबंधितावर प्रशासकीय कारवाई करण्यात येईल आणि त्यांची चाचणी लेखापरीक्षणासाठी पुन:श्च नेमणूक केली जाणार नाही.

१२. सोबतचे **परिशिष्ट अ** प्रमाणे कलम ८१ (३) (क) अंतर्गत संस्थानिहाय चाचणी लेखापरीक्षण कामकाजाची नोंदवही संबंधित निबंधकाने व जिल्हा विशेष लेखापरीक्षकाने आपल्या कार्यालयस्तरावर ठेवावी. सदरहू नोंदवही वार्षिक लक्षांकाप्रमाणे प्राधिकृत लेखापरीक्षकनिहाय ठेवावी. निर्धारित करण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये नियमीत नोंदी घेणेसाठी एका कर्मचाऱ्याची नेमणूक करावी.

१३. सोबतचे **परिशिष्ट ब** प्रमाणे मासीक चाचणी लेखापरीक्षण अहवाल तालुका स्तरावरील सहाय्यक निबंधक व तालुका लेखापरीक्षक यांनी एकत्रीतपणे तयार करून जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांना **दरमहा ५ तारखेपर्यंत** सादर करावा. जिल्हा उपनिबंधक व जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी सदरहू मासीक अहवालाचे संकलन करून त्यांचे जिल्ह्याचा एकत्रीत मासीक अहवाल संबंधित विभागीय सहनिबंधक (प्रशासन व लेखापरीक्षण) यांना **दरमहा ७ तारखेपर्यंत** सादर करावा. विभागीय सहनिबंधक (प्रशासन व लेखापरीक्षण) यांनी त्यांच्या कामकाजाचा अहवाल एकत्रीतपणे संकलीत करून सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना **दरमहा १० तारखेपर्यंत** सादर करावा.

राज्यातील सहकारी संस्थांचा कलम ८१ (३)(क) प्रमाणे वार्षिक चाचणी लेखापरीक्षण कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी या परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे काटेकोररित्या करण्यात यावी. सदर परिपत्रकाची अंमलबजावणी तात्काळ करावयाची असून सन २०१७-१८ या वर्षाचा १ नोव्हेंबर २०१७ पासूनचा वार्षिक कृती आराखडा ३१ऑक्टोबर २०१७ पूर्वी अंतिम रित्या तयार करण्यात यावा. त्याप्रमाणे माहे नोव्हेंबर २०१७ पासून शासकीय लेखापरीक्षकांना दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे त्यांनी कलम ८१ (३)(क) अन्वये चाचणी लेखापरीक्षण करण्याची कार्यवाही करावी.

(डॉ.विजय झाडे)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत पुढील उचित कार्यवाही व उपाययोजनेस्तव -**

१. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (प्रशासन, लेखापरीक्षण) सर्व
२. सहनिबंधक, सहकारी संस्था (दुग्ध) मुंबई.
३. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
४. जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था (सर्व)
५. उपनिबंधक सहकारी संस्था (मत्स्य) मुंबई.
६. पणन संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. साखर आयुक्त, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५

८. संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
९. दुग्ध विकास आयुक्त, वरळी दुध डेअरी, वरळी मुंबई.
१०. मत्स्य व्यवसाय विकास आयुक्त, तारापोरवाला मत्स्यालय, मरीन लाईन मुंबई.
११. अपर आयुक्त व विशेष निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२. अपर निबंधक (वसुली व नियोजन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. अपर निबंधक (प्रशासन), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. अपर निबंधक (तपासणी व निवडणुका), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५. अपर निबंधक (लेखापरीक्षण), सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१६. अपर निबंधक (आदिवासी विकास), सहकारी संस्था, नाशिक.
१७. मा. सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव, मुख्यालय, पुणे.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर -**

१. मा.प्रधान सचिव (सहकार), सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .
२. मा. प्रधान सचिव (पणन) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .
३. मा. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग ,मंत्रालय, मुंबई .

**प्रत माहितीस्तव सस्नेह सादर -**

१. मा. मंत्री (सहकार,पणन) यांचे खाजगी सचिव
२. मा. मंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव
३. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (पणन) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यंत्री (वस्त्रोद्योग) यांचे खाजगी सचिव

**महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० चे क. ८१(३)(क)अन्वये वित्तीय सहकारी संस्थाचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून प्रतिवर्षी करुन घेणेबाबतचे परिपत्रक.**

**परिशिष्ट - '१'**

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका.**
**(एम.एस.सी.बँक - संख्या १, जिमस बँका - संख्या ३१)**

| अ. क्र. | मुद्दा | मुद्यास अनुसरून करावयाचे तपासणीचा तपशील |
|---|---|---|
| १ | नक्तमुल्य (NETWORTH) - | उणे किंवा अधिक / कमी अथवा जास्त यावर परिणाम करणा-या व जबाबदार ठरणा-या घटकांच्या कारणमिमंसेसह पृथ:करण. |
| २ | कर्जव्यवहार (CREDIT APPRAISAL) | अ) नाबार्ड / आर.बी.आय., शासन व आयुक्तालय यांचे परिपत्रकीय सूचनांचा अंतर्भाव करून तयार केलेले कर्ज धोरण, केलेले कर्ज वितरण व कर्ज वसुली.<br>ब) पतपात्र क्षमता न पाहता मंजुर केलेली कर्जे, विनातारणी दिलेली कर्जे, अपु-या तारणावर दिलेली कर्जे, निर्वेध तारण नसताना दिलेली कर्जे, उणे नक्त मुल्य असताना दिलेली कर्जे, वैयक्तीक व समुह कर्ज मर्यादांचे उल्लंघन करून दिलेली कर्जे. |
| ३ | कर्ज थकबाकी (OVERDUE LOANS) | अ) शेती व बिगर शेती (अकृषि) कर्जदारांची कर्ज येणे बाकी, थकबाकी, थकबाकीचे प्रमाण, वसुलीसाठी बँकेने केलेली कारवाई व न केलेली कारवाई इ. बाबी कर्जदार व कर्ज रक्कम या प्रमाणे थकबाकीच्या कारणमिमंसेसह गुणात्मकरित्या पहावी.<br>ब) सहकारी अधिनियमातील कलम **१०१, ९१** व सिक्युरटायजेश ॲक्ट अंतर्गत खातेदार व थकबाकीनिहाय बँकेने कर्ज वसुलीसाठी केलेली व न केलेली कार्यवाही. तदनुषंगाने प्रत्यक्षात झालेली व न झालेली कर्ज वसुली. |
| ४ | अनुत्पादक जिंदगी (N.P.A.) | अ) ढोबळ एन.पी.ए. -<br>१ बँकेची ढोबळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ बँकेचे ढोबळ एन.पी.ए. चे प्रमाण.<br>३ एन.पी.ए.पोटी करावयाची तरतुद रक्कम.<br>४ बँकेने प्रत्यक्षात केलेली तरतुद.<br>५ आवश्यकतेपेक्षा कमी अधिक केलेली तरतुद.<br>६ मागील वर्षीच्या तुलनेत एन.पी.ए. मध्ये झालेल्या वाढ घटीचे प्रमाण<br>ब) निव्वळ एन.पी.ए. -<br>१ निव्वळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण. |
| ५ | सी.आर.अे.आर (CAPITAL RISK TO ADEQUACY RATIO) C.R.A.R. व सी.डी.रेशो (C.D.RATIO ) | कर्ज, ठेवी गुणोत्तर प्रमाण, सी.आर.आर. व एस.एल.आर. आर.बी.आय.निर्देशाप्रमाणे राखणे - पुर्तता व अंमलबजावणी |

| | | |
|---|---|---|
| ६ | आर्थिक स्थिती व उत्पन्न क्षमता - | अ) कर्जावर, गुंतवणूकीवर मिळालेले व्याज व ठेवी, बाहेरील कर्जावर दिलेले व्याज या मधील व्याज दुरावा योग्य प्रमाणात राखलेबाबतचे अभिप्राय (किमान ४ ते ५ %)<br>ब) आर्थिक अनियमितता, अपहार व गैरव्यवहार व बँकेचे आर्थिक नुकसान इ. मुळे बँकेच्या आर्थिक स्थितीवर झालेला विपरित परिणाम. शिवाय या कार्यपध्दतीस व परिणामास आर्थिक रकमेसह जबाबदार पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी इ.<br>क) बँकेस सर्व अनिवार्य आर्थिक तरतुदी परिपुर्णरित्या करणे इतपत रकमेचा ढोबळ नफा झालेबाबतचे अभिप्राय. तदनुषंगाने निव्वळ नफा रास्त असलेबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय. |

**महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० चे क. ८१(३)(क)अन्वये वित्तीय सहकारी संस्थाचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून प्रतिवर्षी करुन घेणेबाबतचे परिपत्रक.**

**परिशिष्ट - '२'**

**नागरी सहकारी बँका (संख्या ५०८)**

| अ. क्र. | मुद्दा | मुद्यास अनुसरून करावयाचे तपासणीचा तपशील |
|---|---|---|
| १ | नक्तमुल्य (NETWORTH) - | उणे किंवा अधिक / कमी अथवा जास्त यावर परिणाम करणा-या व जबाबदार ठरणा-या घटकांच्या कारणमिमंसेसह पृथःकरण. |
| २ | कर्जव्यवहार (CREDIT APPRAISAL) | अ) नाबार्ड / आर.बी.आय., शासन व आयुक्तालय यांचे परिपत्रकीय सूचनांचा अंतर्भाव करून तयार केलेले कर्ज धोरण, केलेले कर्ज वितरण व कर्ज वसुली.<br>ब) पतपात्र क्षमता न पाहता मंजुर केलेली कर्जे, विनातारणी दिलेली कर्जे, अपु-या तारणावर दिलेली कर्जे, निर्वेध तारण नसताना दिलेली कर्जे, उणे नक्त मुल्य असताना दिलेली कर्जे, वैयक्तीक व समुह कर्ज मर्यादांचे उल्लंघन करून दिलेली कर्जे. |
| ३ | कर्ज थकबाकी (OVERDUE LOANS) | अ) शेती व बिगर शेती (अकृषि) कर्जदारांची कर्ज येणे बाकी, थकबाकी, थकबाकीचे प्रमाण, वसुलीसाठी बँकेने केलेली कारवाई व न केलेली कारवाई इ. बाबी कर्जदार व कर्ज रक्कम या प्रमाणे थकबाकीच्या कारणमिमंसेसह गुणात्मकरित्या पहावी.<br>ब) सहकारी अधिनियमातील कलम १०१, ९१ व सिक्युरटायजेश ॲक्ट अंतर्गत खातेदार व थकबाकीनिहाय बँकेने कर्ज वसुलीसाठी केलेली व न केलेली कार्यवाही. तदनुषंगाने प्रत्यक्षात झालेली व न झालेली कर्ज वसुली. |

| | | |
|---|---|---|
| ४ | अनुत्पादक जिंदगी (N.P.A.) | अ) ढोबळ एन.पी.ए. -<br>१ बँकेची ढोबळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ बँकेचे ढोबळ एन.पी.ए. चे प्रमाण.<br>३ एन.पी.ए.पोटी करावयाची तरतुद रक्कम.<br>४ बँकेने प्रत्यक्षात केलेली तरतुद.<br>५ आवश्यकतेपेक्षा कमी अधिक केलेली तरतुद.<br>६ मागील वर्षीच्या तुलनेत एन.पी.ए. मध्ये झालेल्या वाढ घटीचे प्रमाण<br>ब) निव्वळ एन.पी.ए. -<br>१ निव्वळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण. |
| ५ | सी.आर.अे.आर (CAPITAL RISK TO ADEQUACY RATIO) C.R.A.R. व सी.डी.रेशो (C.D.RATIO ) | कर्ज, ठेवी गुणोत्तर प्रमाण, सी.आर.आर. व एस.एल.आर. आर.बी.आय.निर्देशाप्रमाणे राखणे - पुर्तता व अंमलबजावणी |
| ६ | आर्थिक स्थिती व उत्पन्न क्षमता - | अ) कर्जावर, गुंतवणूकीवर मिळालेले व्याज व ठेवी, बाहेरील कर्जावर दिलेले व्याज या मधील व्याज दुरावा योग्य प्रमाणात राखलेबाबतचे अभिप्राय<br>ब) आर्थिक अनियमितता, अपहार व गैरव्यवहार व बँकेचे आर्थिक नुकसान इ. मुळे बँकेच्या आर्थिक स्थितीवर झालेला विपरित परिणाम. शिवाय या कार्यपध्दतीस व परिणामास आर्थिक रकमेसह जबाबदार पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी इ.<br>क) बँकेस सर्व अनिवार्य आर्थिक तरतुदी परिपुर्णरित्या करणे इतपत रकमेचा ढोबळ नफा झालेबाबतचे अभिप्राय. तदनुषंगाने निव्वळ नफा रास्त असलेबाबतचे व नफा वाटणीबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय. |

**महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० चे क. ८१(३)(क)अन्वये वित्तीय सहकारी संस्थाचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून प्रतिवर्षी करुन घेणेबाबतचे परिपत्रक.**

**परिशिष्ट - '३'**

**नागरी/ग्रामिण बिगर शेती/पगारदार सेवकांच्या सहकारी पतसंस्था (संख्या १९०००)**

| अ. क्र. | मुद्दा | मुद्यास अनुसरून करावयाचे तपासणीचा तपशील |
|---|---|---|
| १ | नक्तमुल्य (NETWORTH) - | उणे किंवा अधिक / कमी अथवा जास्त यावर परिणाम करणा-या व जबाबदार ठरणा-या घटकांच्या कारणमिमंसेसह पृथःकरण. |
| २ | गुंतवणूक (INVESTMENT) | अ) राखीव निधी, इमारत निधी व इतर कायदेशीर निधींच्या स्वतंत्र गुंतवणूकीबाबतचे व तरलतेपोटी केलेल्या गुंतवणूकीबाबतचे अभिप्राय. अतिरिक्त निधीच्या अन्य गुंतवणूकीबाबत अभिप्राय. |
| ३ | कर्जव्यवहार (CREDIT APPRAISAL) | अ) पोटनियम, शासन व आयुक्तालय यांचे परिपत्रकीय सूचनांचा अंतर्भाव करून तयार केलेले कर्ज धोरण, केलेले कर्ज वितरण व कर्ज वसुली.<br>ब) पतपात्र क्षमता न पाहता मंजुर केलेली कर्जे, विनातारणी दिलेली कर्जे, अपु-या तारणावर दिलेली कर्जे, निर्वेध तारण नसताना दिलेली कर्जे, उणे नक्त मुल्य असताना दिलेली कर्जे, वैयक्तीक व समुह कर्ज मर्यादांचे उल्लंघन करून दिलेली कर्जे.<br>क) सी.डी.रेशो (C.D.RATIO / कर्ज, ठेवी गुणोत्तर प्रमाण. |
| ४ | कर्ज थकबाकी (OVERDUE LOANS) | अ) कर्जदारांची कर्ज येणे बाकी, थकबाकी, थकबाकीचे प्रमाण, वसुलीसाठी संस्थेने केलेली कारवाई व न केलेली कारवाई इ. बाबी कर्जदार व कर्ज रक्कम या प्रमाणे थकबाकीच्या कारणमिमंसेसह गुणात्मकरित्या पहावी.<br>ब) सहकारी अधिनियमातील कलम **१०१, ९१, ९५** व **१५६** अन्वये खातेदार व थकबाकीनिहाय संस्थेने कर्ज वसुलीसाठी केलेली व न केलेली कार्यवाही. तदनुषंगाने प्रत्यक्षात झालेली व न झालेली कर्ज वसुली. |
| ५ | अनुत्पादक जिंदगी (N.P.A.) | अ) ढोबळ एन.पी.ए. -<br>१ संस्थेची ढोबळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ संस्थेची ढोबळ एन.पी.ए. चे प्रमाण.<br>३ एन.पी.ए.पोटी करावयाची तरतुद रक्कम.<br>४ संस्थेनी प्रत्यक्षात केलेली तरतुद.<br>५ आवश्यकतेपेक्षा कमी अधिक केलेली तरतुद.<br>६ मागील वर्षीच्या तुलनेत एन.पी.ए. मध्ये झालेल्या वाढ घटीचे प्रमाण<br>ब) निव्वळ एन.पी.ए. -<br>१ निव्वळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण. |

| | | |
|---|---|---|
| ६ | आर्थिक स्थिती व उत्पन्न क्षमता - | अ) कर्जावर, गुंतवणूकीवर मिळालेले व्याज व ठेवी, बाहेरील कर्जावर दिलेले व्याज या मधील व्याज दुरावा योग्य प्रमाणात राखलेबाबतचे अभिप्राय (किमान ४ ते ५ %)<br>ब) आर्थिक अनियमितता, अपहार व गैरव्यवहार व संस्थेचे आर्थिक नुकसान इ. मुळे संस्थेच्या आर्थिक स्थितीवर झालेला विपरित परिणाम. शिवाय या कार्यपध्दतीस व परिणामास आर्थिक रकमेसह जबाबदार पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी इ.<br>क) संस्थेस सर्व अनिवार्य आर्थिक तरतुदी परिपुर्णरित्या करणे इतपत रकमेचा ढोबळ नफा झालेबाबतचे अभिप्राय. तदनुषंगाने निव्वळ नफा रास्त असलेबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय. |

**महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० चे क. ८१(३)(क)अन्वये वित्तीय सहकारी संस्थाचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून प्रतिवर्षी करुन घेणेबाबतचे परिपत्रक.**

## परिशिष्ट - '४'
## विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था - (संख्या २१०००)

| अ. क्र. | मुद्दा | मुद्यास अनुसरून करावयाचे तपासणीचा तपशील |
|---|---|---|
| १ | नक्तमुल्य (NETWORTH) व सी.आर.अे.आर. (CAPITAL RISK TO ADEQUACY RATIO) C.R.A.R. | उणे किंवा अधिक / कमी अथवा जास्त यावर परिणाम करणा-या व जबाबदार ठरणा-या घटकांच्या कारणमिमंसेसह पृथ:करण. |
| २ | गुंतवणूक (INVESTMENT) | अ) राखीव निधी, इमारत निधी व इतर कायदेशीर निधींच्या स्वतंत्र गुंतवणूकीबाबतचे अभिप्राय. अतिरिक्त निधीच्या अन्य गुंतवणूकीबाबत अभिप्राय. |
| ३ | कर्जव्यवहार (CREDIT APPRAISAL) | अ) पोटनियम, शासन व आयुक्तालय यांचे परिपत्रकीय सूचनांचा अंतर्भाव करून तयार केलेले कर्ज धोरण, केलेले कर्ज वितरण व कर्ज वसुली.<br>ब) सभासद कर्जे -<br>१) जिंदगी पत्रक अद्ययावत आहे काय? त्याची तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व तारीख.<br><table><tr><td>खातेदार संख्या</td><td>संस्थेची सभासद संख्या</td><td>कर्जदार संख्या</td><td>बिगर कर्जदार संख्या</td></tr><tr><td></td><td></td><td></td><td></td></tr></table><br>२ बिगर कर्जदार सभासदांना कर्ज देणेसाठी संस्थेने केलेले प्रयत्न - |

३ कर्ज मर्यादा पत्रक

| मंजुरी दिनांक | क.म.पत्रकाचा कालावधी | क.म.मंजूर रक्कम | कमाल कर्ज मर्यादा | कर्ज वाटप कमाल कर्ज मर्यादेपेक्षा जादा/कमी | जादा असल्यास निबंधकांची मंजुरी आहे काय? |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

४ कर्ज वाटप व येणे तपशिल -

| अ. क्र. | कर्ज प्रकार | कर्ज वाटप | येणे बाकी | थकबाकी | यादीप्रमाणे बाकी | ताळेबंद व यादी फरक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | अल्प मुदत | | | | | |
| २. | मध्यम मुदत | | | | | |
| ३. | दीर्घ मुदत | | | | | |
| ४. | अन्य कर्जे | | | | | |

५ कर्ज खतावणी, कर्ज नोंदवही (रजिस्टर) अद्ययावत ठेवलेबाबतचा तपशील विषद करा.

६ कर्जदारांना पासबुक/खाते उतारा दिला जात असलेबाबतचा तपशील नमूद करा.

७ किसान क्रेडीट कार्ड (KCC) वर कर्ज वाटप केले जात असल्यास खालील माहिती विषद करा-
-किसान कार्ड धारक संख्या (अ
ब) किसान क्रेडीट कार्ड (KCC) वर कलेले कर्ज वाटप रक्कम-

८ CAS प्रमाणे दप्तर ठेवलेबाबतचा तपशील विषद करा-

९ जमा पावत्या दिल्या जात असल्याबाबत तपशील नमूद करा-

१० कर्जदारांची रुजवात घेवून त्याचे रजिस्टर अद्यावत ठेवलेबाबत तपशील नमूद करा-

११ मागणी, वसुली व येणे बाकी (D.C.B.) नोंदवही अद्ययावत ठेवलेबाबत माहिती विषद करा-

१२ अल्प/मध्यम/दिर्घ मुदत कर्जाबाबत कर्ज मागणी अर्ज, इ-करार, बोजा नोंदसह जतन केलेबाबतचे अभिप्राय नमूद करा-

१३ कर्जाच्या दुप्पट रक्कमेचा बोजा ७/१२ पत्रकावर नोंद केल्याबाबतचा तपशील नमूद करा-

१४ कर्ज रुपांतर करण्याची पध्दती, ठरवून दिलेले नियम यानुसार कर्ज रुपांतराबाबतची माहिती विषद करा-

१५ व्यवस्थापन समिती (संचालक) कर्जाबाबतची माहिती विषद करा—
अ) पोटनियमानुसार कर्ज मर्यादा किती ठरविली आहे?
ब) दिलेली कर्जे, येणे बाकी यानुसार मर्यादा उल्लंघन आहे काय? असल्यास रक्कम —
क) व्यवस्थापन सदस्यांची कर्जाची थकबाकी व त्याबाबत केलेली कारवाई —

१६ संस्थेने कार्यक्षेत्राबाहेरील शेतकऱ्याना कर्ज पूरवठा केला आहे काय असल्यास तपशील नमूद करा-

१७ संस्थेचे बिगर कर्ज व्यवहार उदा. खते व बि-बियाणे, कापड दुकान, स्वस्त धान्य दुकान इ.

| | | |
|---|---|---|
| | | १८ अनिष्ट तफावत -<br>१. सभासद कर्ज येणे बाकी रु.<br>२. बँक कर्ज देणे बाकी रु.<br>३. अनिष्ट तफावत असल्यास रक्कम रु.<br>४. अनिष्ट तफावतीची कारणे सविस्तर नमूद करावीत. |
| ४ | कर्ज थकबाकी (OVERDUE LOANS) | अ) कर्जदारांची कर्ज येणे बाकी, थकबाकी, थकबाकीचे प्रमाण, वसुलीसाठी संस्थेने केलेली कारवाई व न केलेली कारवाई इ. बाबी कर्जदार व कर्ज रक्कम या प्रमाणे थकबाकीच्या कारणमिमंसेसह गुणात्मकरित्या पहावी.<br>ब) केलेली एकूण वसुली विषद करा -<br>१. लिंकींगने वसुली -<br>२. रोखीने वसुली -<br>३. रूपांतरण वसुली -<br>क) वसुलीसाठी कारवाई केलेली संख्या व रक्कम - |

| अ. क्र. | कारवाईचा तपशिल | निवाडा/दाखला मिळालेली प्रकरणे | | वसुली प्रकरणे | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम रु. | संख्या | रक्कम रु. |
| १. | लवाद दावे | | | | |
| २. | कलम ९१ | | | | |
| ३. | कलम १०१ | | | | |
| ४. | अन्य | | | | |

| | | |
|---|---|---|
| | | ड) कर्ज वसुली कारवाईबाबतची नोंदवही अद्ययावत नोंदवलेबाबतचा तपशील विषद करा-<br>इ) कलम ४४ (अ) मधील तरतुदी अन्वये कोणत्याही सभासदास वितरीत केलेल्या कर्जावर कोणत्याही पध्दतीने मुद्दल रक्कमेपेक्षा जादा रक्कमेचे व्याज वसुल केले असल्यास खातेनिहाय तपशील नमूद करा- |
| ५ | अनुत्पादक जिंदगी (N.P.A.) | अ) ढोबळ एन.पी.ए. -<br>१ संस्थेची ढोबळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ संस्थेचे ढोबळ एन.पी.ए. चे प्रमाण.<br>३ एन.पी.ए.पोटी करावयाची तरतुद रक्कम.<br>४ संस्थेनी प्रत्यक्षात केलेली तरतुद.<br>५ आवश्यकतेपेक्षा कमी अधिक केलेली तरतुद.<br>६ मागील वर्षीच्या तुलनेत एन.पी.ए. मध्ये झालेल्या वाढ घटीचे प्रमाण<br>ब) निव्वळ एन.पी.ए. -<br>१ निव्वळ एन.पी.ए. रक्कम.<br>२ निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण. |

| | | |
|---|---|---|
| ६ | आर्थिक स्थिती व उत्पन्न क्षमता | अ) कर्जावर, गुंतवणूकीवर मिळालेले व्याज व ठेवी, बाहेरील कर्जावर दिलेले व्याज या मधील व्याज दुरावा योग्य प्रमाणात राखलेबाबतचे अभिप्राय.<br>ब) आर्थिक अनियमितता, अपहार व गैरव्यवहार व संस्थेचे आर्थिक नुकसान इ. मुळे संस्थेच्या आर्थिक स्थितीवर झालेला विपरित परिणाम. शिवाय या कार्यपध्दतीस व परिणामास आर्थिक रकमेसह जबाबदार पदाधिकारी, संचालक, अधिकारी व कर्मचारी इ.<br>क) संस्थेस सर्व अनिवार्य आर्थिक तरतुदी परिपुर्णरित्या करणे इतपत रकमेचा ढोबळ नफा झालेबाबतचे अभिप्राय. तदनुषंगाने निव्वळ नफा रास्त असलेबाबतचे सुस्पष्ट अभिप्राय. |

------- XXXXX-------

**महाराष्ट्र सहकारी संस्थांचे अधिनियम १९६० चे क. ८१(३)(क)अन्वये वित्तीय सहकारी संस्थाचे चाचणी लेखापरीक्षण शासकीय लेखापरीक्षकांकडून प्रतिवर्षी करुन घेणेबाबतचे परिपत्रक.**

## परिशिष्ट ब

### : चाचणी लेखापरीक्षण कामकाज आढावा :

| अ. क्र. | जिल्हा | चाचणी लेखापरीक्षण आदेश पारित केलेल्या लेखापरीक्षण संस्थांची संख्या | चाचणी लेखापरीक्षण उद्दिष्ट | | | चाचणी लेखापरीक्षण उद्दिष्ट पूर्ती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मागील महिना अखेर | चालु महिन्यातील | एकूण | मागील महिना अखेर | चालु महिन्यातील | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

| चाचणी लेखापरीक्षण पूर्ण झालेल्या संस्थांपैकी | | अपहार/गैरव्यवहार निदर्शनास आलेल्या संस्थांपैकी फौजादरी गुन्हा दाखल संस्था संख्या. | | | आर्थिक नुकसान गैरविनियोग व अनियमितता निदर्शनास आलेल्या संस्थांपैकी प्रशाकीय कारवाई केलेल्या संस्था संख्या. | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अपहार/गैरव्यवहार निदर्शनास आलेल्या संस्था संख्या. (विर्निदिष्ट अहवाल) | आर्थिक नुकसान गैरविनियोग व अनियमितता निदर्शनास आलेल्या संस्था संख्या. (विशेष अहवाल) | मागील महिना अखेर | चालु महिन्यातील | एकूण | मागील महिना अखेर | चालु महिन्यातील | एकूण | |
| १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |